औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकरीता अधिष्ठाता, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई यांनी तयार केलेल्या बोधचिन्हास (Logo) प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्र. औसुवआ-१२२२/प्र.क्र.२१४/कामगार-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २३ मार्च, २०२३.

<u>पहा</u> :- १) प्रभारी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.औसुवआ/आस्थापना/लोगो/२०२२/११८२२/१, दि.३०.११.२०२२.

२) शासनाचे समक्रमांकाचे पत्र दि.५.१.२०२३.

३) प्रभारी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.औसुवआ/आस्थापना/लोगो/२०२२-२३/८८७/१, दि.७.२.२०२३.

<u>प्रस्तावना:-</u>

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकरीता बोधचिन्ह (Logo) बनविणेसाठी प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत, संचालनालयाने अ.क्र.१ येथील दि.३०.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास विनंती केली होती. त्यानुषंगाने, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकरीता बोधचिन्ह (Logo) बनविण्यासाठी "अधिष्ठाता, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई यांचेकडून संचालनालयाकरीता सुयोग्य बोधचिन्हांचे एकापेक्षा अधिक नमुने बनविल्यानंतर अंतिम मान्यतेसाठी बोधचिन्हांचे सदर नमुने शासनास सादर करण्यात यावेत", या अटीच्या अधीन राहून शासनाच्या अ.क्र.२ येथील दि.०५.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर अटीस अनुसरून, अधिष्ठाता, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई यांनी सादर केलेल्या नमुन्यांपैकी संचालनालयातर्फे शिफारस करण्यात आलेल्या बोधचिन्हास (Logo) मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकरीता केशरी, हिरवा, निळा व पांढरा या रंगसंगतीमधील कार्यालयाच्या नावासहीत इंग्रजी आणि मराठी मधील पुढे दर्शविण्यात आलेल्या बोधचिन्हास शासन मान्यता देण्यात येत आहे.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

DIRECTORATE OF INDUSTRIAL SAFETY & HEALTH

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२३०३२३१९१०३६९०१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK S MANDE

Digitally signed by ASHOK S MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, pseudonym=873F0744FC52A040F02A5627B7E5D792D665CCD9, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK S MANDE
Date: 2023.03.23 19:15:37 +05'30'

(अशोक मांडे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीस्तव,

१. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा, यांचे खाजगी सचिव, मुंबई
३. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

प्रति,

१. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई.
२. सर्व प्रादेशिक विभाग प्रमुख, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य (द्वारा: संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई)
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१/महाराष्ट्र-२, मुंबई/नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६. निवड नस्ती.